Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – IV July – August 2021

# अनौपचारिक शिक्षणाची आवश्यकता : एक काळाची गरज

**डॉ. पी. बी. वाघेरे**
*सहयोगी प्राध्यापक*
*ऍड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशात्र महाविद्यालय, नाशिक*

**अनौपचारिक शिक्षण :**

स्थळ, काळ, समाज यांच्या गरजेप्रमाणे, विद्यार्थ्यांच्या सवडीप्रमाणे उपयुक्त असे जे शिक्षण दिले जाते, त्यास अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात.

Non formal education refers to planned, structured programmes and processes of personal and social education for young people designed to improve a range of skills and competencies.

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

Education that is institutionalized, intentional and planned by an education provider. The defining charactenztic of non-formal education is that is an addition, alternative and / or a complement to formal education within the process of the lifelong learning of individuals. It is often provided to guarantee the right of access to education for all. It caters for people of all ages, but does not necessarily apply a continuous pathway, structure, t may be short in duration and /or low intensity, and is typically provided in the form of short courses, workshops or seminars.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – IV July – August 2021

अनौपचारिक शिक्षणात अभ्यासक्रम असतो, पण तो विद्यार्थ्यांच्या अभिरुचीप्रमाणे, पात्रतेनुसार, भिन्न असतो. या शिक्षणाचा हेतू निश्चित केलेला असतो. पण तो व्यक्तिपरत्व भिन्न असतो. त्यात लवचिकता असत. या प्रकारच्या शिक्षणात शिक्षकाचे स्थान गौण असते. विद्यार्थ्यांचे स्थान महत्त्वाचे असते.

मुक्त शाळा, मुक्त विद्यापीठे, समाज, शिबीरे, वाचनालय संस्था इत्यादी अनौपचारिक शिक्षणाचे स्त्रोत आहेत.

**अनौपचारिक शिक्षणाची आवश्यकता :**

१. शिक्षण अर्धवट सोडावे लागणे.

२. समाजाला लागलेली कीड

३. पालकांची उदासीनता

४. उदरनिर्वाहासाठी व्यवसाय

५. अपुरे शिक्षक

६. वाढते निरक्षरतेचे प्रमाण

७. सामाजिक समस्या

८. औपचारिक शिक्षणाच्या मर्यादा, औपचारिक शिक्षणाविरुद्ध बंड

९. अनौपचारिक शिक्षणाची सर्वव्यापकता

१०. स्त्री शिक्षण

वरील मुद्द्यांच्या आधारे अनौपचारिक शिक्षणाच्या आवश्यकते संदर्भात पुढीलप्रमाणे विस्तृत चर्चा करता येईल.

**१. शिक्षण अर्धवट सोडावे लागते :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती हा मुख्य व्यवसाय जर शेतीशी निगडीत जोडधंदे हे येथील मुख्य व्यवसाय आहेत. आई-वडील शेतावर किंवा मजुरीवर गेल्यावर लहान भावडांना सांभाळणे, गुरे राखणे, गुरांना चारा-पाणी करणे, आई-वडीलांसाठी न्याहारी तयार करणे ही कामे बालकाला करावी लागतात.

या बालकाला आपण शाळेत नियमित येअसे म्हणू शकत नाही. अशा वेळी बालकाच्या वेळेनूसार शाळाच अनौपचारिक शिक्षणाद्वारे त्याच्याकडे जाऊ शकते. त्याद्वारे त्याचे अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण केले जाऊ शकते.

**२. समाजाला लागलेली कीड :**

अंधश्रद्धा,दारिद्र्य या भारतीय समाजाला लागलेली कीड आहेत. देशाची प्रगती करावयाची असेल तर या कीडीचे उच्चाटन झाले पाहिजे. समाजातील प्रौढ व्यक्ती तर, शाळेत येऊ शकत नाही परंतु अनौपचारिक शिक्षणाद्वारे त्यांच्यामध्ये जनजागृती केली जाऊ शकते.

**३. पालकांची उदासीनता :**

आम्ही शिकलो नाही तरीही आमचे कोठे अडले? ही उदासीन भूमिका पालकांची बनली आहे. अनौपचारिक शिक्षणाद्वारे ग्रामसभा, जनजागृती करुन नवीन प्रेरणा निर्माण केली जाऊ शकते.

**४. उदरनिर्वाहासाठी व्यवसाय :**

भारतामध्ये मुलांना आई-वडीलांची म्हतारपणाची काठी समजली जाते. त्यामुळे बालकाला थोडी समज आली की, त्याला पिढीजात व्यवसायात गुंतून दिले जाते. अशा वेळी बालकाला त्याच्या सवडीनूसार त्याच्या व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन अनौपचारिक शिक्षण दिले जाऊ शकते. त्याद्वारे त्याला व्यवसाय कुशल बनविले जाऊ शकते.

**५. अपुरे शिक्षक :**

भारत हे सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. शिक्षणाचे महत्त्व सर्वांना समजले आहे. त्यामुळे शिक्षण घेण्याकडे सर्वांचा कल आहे. परंतु एकतर शाळा, महाविद्यालय यांची संख्याही अपुरी पडते. आणि दुसरे म्हणजे प्रशिक्षित शिक्षकांची संख्याही कमी आहे. अशा वेळी अनौपचारिक शिक्षण देणारा खूप पदव्या लावणारा नसला तरी चालतो. फक्त त्याला जीवनोपयोगी ज्ञान असेल तरी तो समाज परिवर्तनात भर घालतो. त्याद्वारे राष्ट्र परिवर्तन करु शकतो.

**६. वाढते निरक्षरतेचे प्रमाण :**

भारतामध्ये साक्षरतेचे प्रमाण दक्षिण भारतात जास्त आहे तर उत्तर भारतात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. ज्या देशात जास्तीत जास्त लोक साक्षर आहेत, तोच देश प्रगती करु शकतो. अनौपचारिक शिक्षणाद्वारे निरनिराळे साक्षरता अभियान राबवून देशाला प्रगतीपथावर नेता येईल.

**७. सामाजिक समस्या :**

सामाजिक समस्येवर मात करण्यासाठी भारतात सद्य:स्थितीत आरोग्य, लोकसंख्या वाढ, व्यसने, उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेले आधुनिक ज्ञान, तंत्र यांची वानवा वा समस्या भेडसावत आहेत. औपचारिक शिक्षणाद्वारे बालकाला शाळेत शिक्षण देऊन काय योग्य ते सांगितले जाते. अनौपचारिक शिक्षणाद्वारे प्रत्यक्ष समस्येचे निराकरण करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे त्याचे महत्त्व वाढलेले आहे.

**८. औपचारिक शिक्षणाच्या मर्यादा :**

जगात सर्वत्र औपचारिक शिक्षणास महत्व दिले जाते. परंतु औपचारिक शिक्षणाने ज्या गोष्टी साध्य व्हाव्यात अशी अपेक्षा असते त्या सर्व साध्य होत नाहीत. उदा. बेरोजगारी, तांत्रिक व व्यावसायिक क्षमतांच्या विकासासाठी व्यक्तीस जीवनोपयोगी सर्वच अनुभव यातून मिळत नाहीत. हे पुस्तकी पंडीत तयार करते. व्यवहारी नागरीक तयार करण्याचे सामर्थ्य त्यात नाही.

श्वान इलिच आणि रिम यांनी दि स्कूलिंग सोसायटी कम्पलसरी मिसएज्युकेशन, द स्कूल इज डेड यासारख्या पुस्तकांतून औपचारिक शिक्षणाविरुद्ध बंड पुकारले.

**९. अनौपचारिक शिक्षणाची सर्वव्यापकता :**

अनौपचारिक शिक्षण हे वयोगटावर अवलंबून नाही. प्रत्येक वयोगटासाठी अनौपचारिक शिक्षणाचा कार्यक्रम आखता येतो. व्यावसायिक, अंशकालिन व पत्राद्वारा शिक्षणाची सोय यात असते. निरंतर शिक्षणाची सोय असते. युवक

कल्याण कार्यक्रम, ग्रामीण नभोवाणी मंडळ व सांस्कृतिक मंडळे याचाही समावेश यात होतो.

**१०. स्त्री शिक्षण :**

भारतामध्ये अंधश्रद्धेमुळे आजही मुलगी जन्मली की पाप समजले जाते. अशा वेळी तिला शाळेत पाठविणे ही तर दूरची कल्पना. परंतू जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगा उद्धारी या तत्त्वानूसार एक स्त्री संपूर्ण घराला शिकवू शकते. अनौपचारिक शिक्षणाद्वारे स्त्रीला तिच्या वेळेनुसार १०-१२ गृहिणी एकत्र करुन शिवणकामाचे, आहार-पोषणाचे अथवा पाककलेचे शिक्षण घेऊ शकतील.

थोडक्यात अनौपचारिक शिक्षणाची व्याप्ती अमर्याद आहे. अनौपचारिक शिक्षण योजना यशस्वी होण्यासाठी खुल्या शाळा, खुली महाविद्यालये, मुक्त विद्यालये यांच्या जोडीला खुल्या प्रयोगशाळा, कार्यशाळा व यंत्रशाळा निर्माण व्हावयास हव्यात. ग्रंथालये, वाचनालय यातून सर्वांना मुक्त प्रवेश हवा. समुह संपर्क माध्यमांचा प्रभावी उपयोग हवा. व्यक्तीच्या व पर्यायाने राष्ट्राच्या विकासासाठी अनौपचारिक योजना फलदायी आहे.

**संदर्भ सूची**

के.यु. घोरमोडे, कला घोरमोडे, **शैक्षणिक विचारवंत : भारतीय व पाश्चात्य,** नागपुर : विद्या प्रकाशन.

कुंडले, म.बा. (नोव्हेंबर २००३), **शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र,** पुणे : श्री विद्या प्रकाशन.

शिवणेकर, ल.मा. (जुलै १९९६), **माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपद्धती,** पुणे : नूतन प्रकाशन.

दुनाखे, अरविंद, **प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान,** पुणे : नूतन प्रकाशन.

आहेर, हिरा, **उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक,** नागपुर : विद्या प्रकाशन.

Agrawal, S (2007), **Philosophical Foundations of Education,** Delhi : Authors press.

Bhatia, S & Sarin A (2004) **Philosophical Foundation of Education in India,** Jaipur : ABD Publishers.

Uis.unesco.org/en/glossary-term/non-found-education.